# मी काही साधू संत नाही! बीडमध्ये पाऊल ठेवताच अजितदादांनी दिला खमक्या दम !!

**जी कामे माझ्या स्तरावर आहेत, ती मी करेन, पण जी कामे मुख्यमंत्र्यांचा स्तरावरील आहेत, ती मी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालेन !**

**अजित पवार म्हणाले, मी ज्यांना सहकार्य करतो त्यांनी मलाही सहकार्य करावे! मी काही साधू-संत नाही, हे ही सांगायला विसरले नाहीत !!**

बीड । दिव्य न्युज

उपमुख्यमंत्री अजित पवार आज जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी बीड दौऱ्यावर आहेत.

बीडचे पालकमंत्रीपद स्वीकारल्यानंतर ते पहिल्यांदाच बीड जिल्ह्याचा दौरा करत आहेत. दरम्यान मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येमुळे बीडचर्चेत आले आहे.

अशात देशमुख यांच्या हत्येमध्ये अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे सहकारी वाल्मिक कराड यांच्या हात असल्याचा आरोप विरोधकांसह सत्ताधारी पक्षांतील नेतेही करत आहेत. त्यामुळे अजित पवार यांचा हा बीड दौरा महत्त्वाचा असणार आहे. दरम्यान अआज सकाळी बीडमध्ये आल्यानंतर अजित पवार यांनी सर्वात आधी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीनंतर बोलताना अजित पवार यांनी बीडमधील गुन्हेगारी, खंडणीसारखे प्रकार, पिस्तूलांची दहशद यासह विकास कामांवरही भाष्य केले. यावेळी अजित पवार यांनी, मी ज्यांना सहकार्य करतो त्यांनी मलाही सहकार्य करावे, मी काही साधू-संत नाही म्हटले आहे.



**रिवॉल्व्हर हे तुमच्या संरक्षणासाठी आहे. त्यामुळे तुम्ही जे रील वगैरे बनवाता ते मी खपवून घेणार नाही**

## अजित पवार यांनी बीडमधील गुन्हेगारी, खंडणीसारखे प्रकार, पिस्तूलांची दहशत यासह विकास कामांवरही केले भाष्य

### "जर कुणी खंडणी मागितली तर", अजित पवारांनी स्पष्टच सांगितलं!

● मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर सध्या राज्यभरात चर्चा आहे. देशमुख यांच्या हत्येमुळे बीडमधील खंडणीसह विविध प्रकारचे गुन्हे समोर आले आहेत. अशात उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार आज बीड दौऱ्यावर आहेत. अजित पवार यांनी आज सकाळी बीडमध्ये राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर बोलताना अजित पवार यांनी खंडणी मागणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. त्याचबरोबर रिवॉल्व्हर घेऊन फिरणाऱ्यांचा परवाना रद्द करण्याच्या सूचना पोलिसांना देण्यार असल्याचेही अजित पवारांनी स्पष्ट केले आहे.

### खंडणी मागणाऱ्यांवर मकोका लावणार!

● यावेळी बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीवर बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे पाहायला मिळाले. ते म्हणाले, "बीड सध्या सातत्याने चर्चेत आहे.

● अफवांवर कोणीही विश्वास ठेऊ नये. जिथे काही तथ्य असेल तिथे कारवाई करणार आहे. त्याचबरोबर विकास कामे करत असताना कोणी कोणाला खंडणी मागण्याचा प्रयत्न करू नये.

● जर असले प्रकार माझ्या कानावर आले तर मी मकोका लावायलाही मागे पुढे पाहणार नाही. यासाठी मी टोकाची भूमिका घेणार आहे. मी इथले अधिकारीही पाहणार आहे, इथे काही अधिकारी बऱ्याच वर्षांपासून आहेत, त्यामध्येही मी लक्ष घालणार आहे. असे करत असताना मी कोणताही भेदभाव करणार नाही."

### तर रिवॉल्व्हर परवाने रद्द करणार!

गेल्या काही दिवसांमध्ये बीडमधील रिवॉल्व्हरने हवेत गोळीबार करणारे आणि कंबरेला रिवॉल्व्हर लावून फिरणाऱ्यांचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यावरही अजित पवार यांनी यावेळी भाष्य केले. ते म्हणाले, "आपण पाहतो टीव्हीवर कधी कधी दाखवले जाते की, कोणी रिवॉल्व्हरने हवेत गोळीबार करते, कोणी कंबरेला रिवॉल्व्हर लावून फिरते. मी पोलीस प्रशासनाला सांगणार आहे, जो कोणी असले प्रकार करेल, त्याचा रिवॉल्व्हर परवाना रद्द करावा. रिवॉल्व्हर हे तुमच्या संरक्षणासाठी आहे. त्यामुळे तुम्ही जे रील वगैरे बनवाता ते मी खपवून घेणार नाही

### मी काही साधू-संत नाही!

● यावेळी विकास कामांबाबत बोलताना अजित पवार म्हणाले, "जी कामे माझ्या स्तरावर आहेत, ती मी करेन, पण जी कामे मुख्यमंत्र्यांचा स्तरावरील आहेत, ती मी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालेन. असे करताना मी स्थानिक लोकप्रतिनिधींनाही विश्वासात घेईन. मंत्रीमंडळात तुमच्या भागातील दोन सहकारी आहेत. एक धनंजय मुंडे आणि दुसऱ्या पंकजाताई. त्यांनाही आम्ही विश्वासात घेऊ. कामांमध्ये कोणताही भेदभाव केला जाणार नाही. पण मी जर भदेभाव करत नसेन, तर मी ज्यांची कामे करतोय त्यांनीही भेदभाव केला नाही पाहिजे. नाहीतर मी त्यांचे काम करणार आणि ते खाली तिसरेच काहीतरी करणार, असले मी खपवून घेणार नाही. मी सरळ सांगणार तुमचे हे दुटप्पी वागणे असेल तर मी काम करणार नाही. मी काही साधू- संत नाही. मी सरळ मार्गी आहे.

---

# वाळू चोरीसाठी आणलेले नदिपात्रातील तराफे केले जाळून खाक

## तहसीलदार किशोर यादव यांची धडक कारवाई

श्रीक्षेत्र माहूर । दिव्य न्युज : आदेश बेहेरे

माहूर तालुक्याला वळसा घालून गेलेल्या पैनगंगा नदी पात्रावरील चोलेवाडी या गावाला लागून असलेल्या चोले पेंड या नदी पेंडाला लागून असलेल्या नदीपात्रात वाळू तस्करांनी वाळू चोरी करण्यासाठी नदीपात्रातील पाण्यात दोरीने बांधून ठेवलेले दोन तराफे तहसीलदारांनी पाण्यातून नदीपात्रावर आणून जागेवरच जाळून भस्म केल्याची घटना दिनांक २८ रोजी दुपारी दोन वाजता घडल्याने वाळू तस्करांच्या मनात तहसीलदारांच्या धडक कारवाईची धडकी भरली आहे




गेल्या आठवड्याभरापासून तहसीलदार किशोर यादव यांनी वाळू चोरीसाठी नदीपात्रातून बनविलेले रस्ते खोदण्याचे काम सुरू केले असून विदर्भातील वाळू तस्कर ही माहूर च्या हद्दीतून पैनगंगा नदी पात्रातून वाळू रात्रीला वाळू चोरी करत असल्याने महागाव आर्णि तहसील हद्दीतील असलेल्या पैनगंगा नदी पात्रावर तहसीलदार किशोर यादव यांनाच नजर ठेवावी लागत असल्याने रात्री कुठेही जावे लागत आहे त्यातच मराठवाडा विदर्भातील वाळू तस्कर तहसीलदारांच्या धडक् कारवाया मोठ्या प्रमाणात होत असल्याने विदर्भ आणि मराठवाडच्यातील वाळू तस्करांनी संगणमत करून रात्रीला तरफ्याद्वारे वाळू उपसणार असल्याची माहिती मिळाल्याने तहसीलदारांनी अनेक ठिकाणी लपवून ठेवलेले तराफे जाळले असून नदीपत्रात दोरी च्या साह्याने बांधून नदीच्या वळणावर पाण्यात लपून ठेवलेले तराफे नदीपात्रातील पाण्यात उतरून बाहेर काढत ते जाळून भस्म करत असल्याने वाळू तस्कर बिळात लपून बसले की काय असा भास होत आहे. अनेक ठिकाणी वाळू तस्करांनी तराफे लपवून ठेवलेले असल्याची माहिती मिळाल्याने तहसीलदार किशोर यादव यांनी तलाठी एस डी गावंडे महसूल सेवक दीपक लोखंडे वाहन चालक विलास शेडमाके यांचे सह ही तराफे जाळण्याची भस्मासुरी कारवाही केल्याने विदर्भातील गोळीबार करणारे डॉन बिळात लपले असून तहसीलदारांच्या वेळप्रसंगी गोळी घालण्याचा इशाऱ्यामुळे वाळू तस्करी सध्या तरी बंद दिसत आहे

---

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या डिजिटल मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अनिल आगुंडे यांची निवड

बीड । दिव्य न्युज

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई ची राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन दि २८ जानेवारी मंगळवार रोजी मोरेश्वर सभागृह कोथरूड,पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, च्या डिजिटल मिडियाच्या बीड जिल्हा अध्यक्ष पदी अनिल आगुंडे यांची निवड करण्यात आली.

ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन चे राष्ट्रीय अध्यक्ष अशोकराव वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संजयजी भोकरे साहेब, राजकिय विश्लेषक देसाई, सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, डिजिटल मिडिया प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे,अक्षय पुजारी यांच्या प्रमुख उपस्थितीत हि निवड करण्यात आली. यावेळी राज्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते. अनिल आगुंडे हे गेल्या आठ नऊ



वर्षापासून पत्रकार संघाचे गेवराई तालुका कार्याध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय जी भोकरे यांच्या आदेशावरून डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्या हस्ते अनिल आगुंडे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. आतापर्यंत जसे मनोभावे या संघाचे कार्य मी केले त्यापेक्षाही अधिक चांगल्या पद्धतीने मी महाराष्ट्र पत्रकार संघासाठी काम करेल व पत्रकार संघाचे संघटन करून जिल्हाभरामध्ये संघटनेचे जाळे निर्माण करेल असे मनोगत यावेळी अनिल आगुंडे यांनी व्यक्त केले. दरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजयजी भोकरे, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे,प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे, यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विभागीय उपाध्यक्ष, सुनील पोपळे,गेवराई तालुका अध्यक्ष अंकुश आतकरे, साप्ताहिक गेवराई संघर्ष योद्धा चे संपादक अमोल कापसे, साप्ताहिक लोकनाथ चे संपादक शेख अब्दुल रहमान, गेवराई टाईम्स संपादक शेख सलमान,राम संभाहारे,राहुल गिरे, यांच्यासह अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

---

# अंगणवाडीच्या विद्यार्थिनीचे शाळेच्या कार्यक्रमात नृत्य

## चिंचोटीच्या शाळेत समृद्धीने केला उत्तम डान्स; महाराष्ट्रीयन वेशभूषा आणि भगवा ध्वज हातात घेऊन केलेलं नृत्य पाहून गावकरी आणि गुरुजनांनी केले तोंड भरून कौतुक

वडवणी । दिव्य न्युज

तालुक्यातील चिंचोटी जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.. या कार्यक्रमात गावातील अंगणवाडी मध्ये जाणारी चिमुकली कु. समृद्धी अशोक फपाळ या चार वर्षीय बालिकेने खूप सुंदर नृत्य सादर केले. तीचे या नृत्य पाहून शाळेतील सर्व शिक्षक आणि गावकऱ्यांनी तोंडभर कौतुक करीत टाळ्यांचा एकच कडकडाट केला.

चिंचोटी शाळेत दरवर्षी विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केलेलं असतं. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शाळेच्या वतीने विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात जिल्हा परिषद चिंचोटी शाळेतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी एकाहून एक असे कार्यक्रम सादर केले. शाळेच्या सर्व शिक्षकांनी मोठ्या मेहनतीने या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. मात्र याच कार्यक्रमात चिंचोटी येथील अंगणवाडीत शिक्षण घेणारी चार वर्षीय चिमुकली दाखल झाली. कु. समृद्धी अशोक फपाळ या



चिमुकल्या बालिकेने आम्ही शिवकन्या या गीतावर सुंदर नृत्य केलं. छत्रपती शिवरायांची मी कन्या आहे आम्ही जिजाऊची लेक आहोत, आम्ही झाशीच्या राणी आहोत, अशा या गीताचा संदेश देत हातामध्ये भगवा झेंडा घेऊन मुलींनी स्वसंरक्षणाचा असा बोध या गीतातून देत भगव्या झेंड्यावर आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीला जागृत करणारे नृत्य चिमुकल्या समृद्धीने सादर केलं. हे नृत्य पाहून शाळेतील सर्व शिक्षक आणि कार्यक्रम पाहण्यासाठी गावातून आलेल्या प्रेक्षक गावकऱ्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून तिचं कौतुक केलं. एवढ्या छोट्या वयात तिने केलेले नृत्य पाहून सर्वांनी कौतुक केलं. भावी काळात एक सुंदर नृत्यांगना होऊ शकते अशा शुभेच्छा तिला शाळेच्या शिक्षकांनी दिल्या. या कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय नांदे, सहशिक्षक गोवर्धन राऊत, तात्याराव गडदे, बापू धनवे, आशिष इंगळे, महेश घोळवे, संतोष देवकते, रमेश भोज, लक्ष्मीबाई गोंडे यांच्यासह गावातील सरपंच भागवत गोंडे, उपसरपंच गोविंद गोंडे, चेअरमन महादेव गोंडे, ज्येष्ठ पत्रकार रामेश्वर गोंडे, अशोक गोंडे, मुरली येळवे, चित्रपट दिग्दर्शक प्रा श्रीनिवास काकडे, दत्ता गोंडे, शालेय समितीचे अध्यक्ष सुसेन मायकर, उपाध्यक्ष सोनाजी गोंडे, शिक्षण प्रेमी नागरिक दिनकर गोंडे, समाधान काकडे, विनोद काकडे, रामचंद्र बादाडे, ग्रामपंचायत सदस्य साहेबराव गोंडे यांच्यासह गावातील सर्व नागरिकांनी तिला उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**गीताच्या निवडीबद्दल आई-वडिलांचे कौतुक..**

चित्रपटातील धांगडधिंगा गीतावर नृत्य करण्यापेक्षा आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आणि महाराष्ट्रातील महापुरुष यांच्या विचाराला अभिवादन करणार हे गीत एका चिमुकलीसाठी निवडता आलं तिच्या या गीताच्या निवडीबद्दल तिचे वडील अशोक फपाळ आणि आई प्रतिभा फपाळ यांचेही उपस्थितांनी तोंड भरून कौतुक केलं

**हशिक्षक इंगळे सर यांचे परिश्रम...**

चिंचोटी जिल्हा परिषद शाळेतील सहशिक्षक आशिष इंगळे सर यांनी मागील अनेक दिवसांपासून शाळेतील विद्यार्थ्यांना कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी परिश्रम घेतले कार्यक्रमातील सर्व नियोजन आणि विद्यार्थ्यांचे नृत्य देखील त्यांनीच बसवले त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---

# जामखेड जिल्हा परिषद उर्दू शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आणि शैक्षणिक सहल

अंबड । दिव्य न्युज

अंबड तालुक्यातील जामखेड गावातील जिल्हा परिषद उर्दू शाळेत प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आणि शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. पहिली ते नववी इयत्तेपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण देणारी ही शाळा, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक उपक्रमांसाठी ओळखली जाते.

विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांची थेट ओळख शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. यामध्ये अडुल साखर कारखाना, औरंगाबादमधील ऐतिहासिक स्थळे, दौलताबाद किल्ला आणि खुलताबाद यांसारख्या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेट देण्याची संधी मिळाली. या सहलीत मुलांनी ऐतिहासिक वारसा, किल्ल्यांचे महत्त्व आणि ऐतिहासिक व्यक्तींच्या योगदानाविषयी सखोल माहिती मिळवली. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे दमदार प्रदर्शन प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शाळेत भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात पवित्र कुरआन पठण आणि नात-ए-शरीफ ने झाली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, राष्ट्रीय गीते, नृत्य आणि विविध कलात्मक सादरीकरणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या प्रभावी सादरीकरणाला पालक आणि ग्रामस्थांनी जोरदार प्रतिसाद दिला. विशेषतः, छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर नृत्याला मोठ्या प्रमाणात दाद मिळाली.

गावातील प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती आणि



शिक्षकांचा गौरव

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयशा बाजी यांनी प्रभावीपणे पार पाडले. गावातील प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ते झाकीर भाई यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ आणि शाल देऊन स्वागत केले. शाळेचे मुख्याध्यापक पनजरकर सर आणि शिक्षकवृंदांच्या समर्पित कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशामागे शिक्षण समिती आणि शिक्षकांचा मोलाचा वाटा

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष असीर भाई आणि सदस्य झाकीर भाई, अख्तर भाई, सद्दाम भाई यांचे मोलाचे योगदान राहिले. तसेच दूर्दाना बाजी आणि फराहाना बाजी यांनी कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. शेवटी रिजवाना बाजी यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. हा संपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला. गावकऱ्यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक करत भविष्यातही अशाच प्रकारचे कार्यक्रम आयोजित करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

---

# परभणी जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न

## कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्णच असावीत-पालकमंत्री मेघना बोर्डीकर

परभणी/ दिव्य न्युज :सालेह चाऊस

जिल्हयातील विकास कामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेचा संपूर्ण निधी वेळेत खर्च करावा, सर्व कामेही दर्जेदार व गुणवत्तापूर्णच असावीत आणि निधी परत जाणार नाही, याची विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी, अशी सूचना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि.२९ ) जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस खासदार फौजिया खान, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार राजेश विटेकर, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथूर, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, महानगर पालिका आयुक्त धैर्यशील जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, जिल्हा नियोजन अधिकारी किशोरसिंग परदेशी आदींसह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. परभणी जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील, असे सांगून पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, जिल्हयाच्या विकासात जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीचा मोठा वाटा असतो. या निधीच्या माध्यमातून अनेक विकासकामे मार्गी लागतात. त्यामुळे निधी वेळेत खर्च होईल याची सर्वांनीच दक्षता घ्यावी. शेती, शिक्षण, आरोग्य क्षेत्राच्या विकासावर अधिक भर देण्यात यावा. कामे ही दर्जेदारच असावीत. एकाच कामासाठी वेगवेगळया योजनेतून प्राप्त निधी खर्च झाल्याचे निदर्शनास आल्यास त्यास संबंधित अधिकार्याला जबाबदार धरण्यात येईल. शाळा, अंगणवाडयाच्या दुरुस्तीसाठी अधिकार्यांनी प्रत्यक्ष भेटी द्याव्यात. सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हयातील सर्वच शहरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत. यात्रा स्थळांच्या विकासातंर्गत संवर्धनासाठी जिल्हयातील प्राचीन मंदिरं, महत्त्वाची स्थळे, यात्रेची महत्त्वाची ठिकाणे यांचा प्राधान्याने प्रस्तावात समावेश करावा. ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याच्या प्रलंबित योजना तातडीने मार्गी लावाव्यात. रेशीम शेती, फळबाग लागवडीच्या क्षेत्रात वाढ करावी, यासाठी शेतकर्यांना विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. ग्रामीण भागातील रस्ते दुरुस्ती, वीज वितरण व्यवस्था सुरळीत करणे, ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती याकडेही प्राधान्याने लक्ष देऊन कामे वेळेत पूर्ण करावीत. मानव निर्देशांकात आपला जिल्हा अग्रेसर राहिल, याची सर्व विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री यांनी सूचित केले.




खासदार फौजिया खान यांनी गड, किल्ले, महत्त्वाची स्मारके यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करण्यात यावा. अंगणवाडया दुरुस्ती प्राधान्याने करण्याबरोबरच सर्व कामे पारदर्शक व दर्जेदार करण्याचे सूचित केले. आमदार गुट्टे यांनी ग्रामीण भागात ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती, नियमित वीज पुरवठा, घरकुलांसाठी रेती उपलब्धता, रुग्णवाहिकेचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली.

दिव्य वार्ता
गुरुवार ३० जानेवारी २०२५ | ४

## ग्रामीण प्रशालेत भव्य पुस्तक प्रदर्शन तहसीलदार गोविंद येरमे हस्ते उद्घाटन संपन्न

उमरगा । दिव्य न्युज

तालुक्यातील मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ग्रामीण प्रशाला माडज येथे भव्य पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन तहसीलदार गोविंद येरमे यांच्या हस्ते करण्यात आले. तहसील कार्यालय उमरगा, गटशिक्षण कार्यालय पंचायत समिती उमरगा आणि ग्रामीण प्रशाला, माडज यांच्या संयुक्त विद्यमाने हे पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या पुस्तक प्रदर्शनामध्ये एकूण २००० ग्रंथ मांडण्यात आले होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, विठ्ठल गायकवाड, अध्यक्ष, छत्रपती तरुण शिवाजी तरुण मंडळ, माडज, मा. पेठसांगवीकर बी. एम. मुख्याध्यापक ग्रामीण प्रशाला माडज, शिक्षणविस्तार अधिकारी कदम, जोशी व केंद्रप्रमुख पांचाळ सर, सुतार सर उपस्थित होते.

नारंगवाडी व गुगळगाव केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या पुस्तक प्रदर्शनास भेट दिली.



# बंद सांगाड्याला डीपीसी तून मिळावा जीव

## बीड शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न पाच वर्षांपासून प्रलंबित

## जिल्हा नियोजन समितीकडून बंद सिग्नलच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याची शक्यता

### दुरुस्तीबाबत कोणालाही देणे-घेणे नाही

■ वाहतूक व्यवस्थेची जबाबदारी जरी पोलिसांची असली तरी सिग्नल यंत्रणा उभारणी व देखभाल दुरुस्तची जवाबदारी नगर पालिकेची असते. त्याप्रमाणे शहरातील प्रमुख रहदारीच्या ठिकाणी पालिकेने लाखो रुपयांचा खर्च करून सिग्नल यंत्रणा उभारली. परंतु, आज पाच वर्षांनंतरही ही सिग्नल व्यवस्था पूर्णपणे बंद आहे. मध्यंतरी कोट्यवधी रुपये खर्चून शहरात ठिकठिकाणी कॅमेरे बसवण्यात आले. परंतु अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या या सिग्नल यंत्रणेच्या दुरुस्तीबाबत पुन्हा कोणालाही देणेघेणे नाही. विशेष म्हणजे शहरातील एकही सिग्नल सध्या सुरु नाही.

### जिल्हा नियोजन समितीमधून अपेक्षा

■ गुरुवारी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक आहे. जिल्ह्याचे शहर असलेल्या बीडच्या सिग्नल व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी समितीमधून निधी मिळण्याची अपेक्षा आहे.

"सिग्नल यंत्रणा गृह विभागाकडे असते. आमच्याकडे त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठीचे कुठलेही हेड वा निधी नाही. मात्र, जिल्हा नियोजन समितीमधून नावीन्यपूर्ण योजनेखाली निधी मिळाला तर दुरुस्ती करण्यात येईल.

**- निता अंधारे,**
मुख्याधिकारी,
नगर पालिका बीड.

बीड । दिव्य न्युज

वाहतूक नियोजनात वाहतूक शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्यांसह सिग्नल यंत्रणा महत्त्वाची आहे. शहरातील चौकाचौकांत नगर पालिकेने लाखो रुपये खर्च करून उभारलेली सिग्नल यंत्रणा पाच वर्षांपासून बंद आहे. परिणामी बीडकरांना दररोज प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चुन उभारलेले सिग्नल केवळ देखाव्यापुरतेच उरलेले आहेत. गुरुवारी (ता. ३०) होणाऱ्या जिल्हा नियोजन समितीमधून तरी या सिग्नल यंत्रणेत जीव यावा म्हणजेच दुरुस्तीला निधी मिळावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

वाहतूक कोंडी ही बीड शहराची मोठी समस्या आहे. विस्ताराच्या तुलनेने शहराची बाजारपेठ मोठी आहे. तसेच, धुळे-सोलापूर आणि बीड - अहिल्यानगर हे दोन राष्ट्रीय महामार्ग शहरातून जातात. त्यामुळे बस, कार, ट्रक, दुचाकी, टमटम, ॲपे रिक्षा, टेम्पो अशी हजारो वाहनांची शहरातून ये जा असते. यात प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक, बार्शी नाका चौक,

►► पान २ वर





बीड : छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौकातील बंद सिग्नल. (दुसऱ्या छायाचित्रात) अण्णाभाऊ साठे चौकातील बंद यंत्रणा व वाहतूक कोंडी.

## अल खैर ग्रुपची सायमाच्या उपचारासाठी ११ हजारांची मदत



पाटोदा / दिव्य न्युज

शेतात भावंडांसोबत खेळतांना अनावधानाने बेलगाडी पल्टी होऊन उपचाराअभावी अंपगत्व आलेल्या सायमाची व्यथा विविध वर्तमानपत्रात ठळकपणे प्रकाशित झाल्यानंतर सायमाच्या उपचारासाठी मदतीचा ओघ सुरू असुन याच अनुषंगाने पाटोदा तालुक्यासह विविध शहरातील नव तरूणांनी एकत्रीत येऊन अल खैर ग्रुपची स्थापना केली असून या माध्यमातून दर महिन्याला आपल्या बचतीतुन ठराविक रक्कम अल खैर ग्रुपच्या अकाउंट मध्ये टाकण्यात येते त्या रक्कमेतुन गरजवंत तसेच अडचणीत असलेल्यांना मदत केली जाते याच अनुषंगाने मागील काही दिवसांपासून सायमाच्या उपचारासाठी मदतीचे आवाहन करण्यात येत असल्याने अल खैर ग्रुपच्या सदस्यांनी एकत्रित चर्चा करून सायमाच्या उपचारासाठी ११ हजारांची मदत सय्यद शफाउद्दीन पत्रकार हमीदखान पठाण व पत्रकार जावेद शेख यांच्याकडे सोपविण्यात आली.खऱ्या अर्थाने नवतरूणांनी छोटच्या बचतीच्या माध्यमातूनही मोठे कार्य उभे राहु शकते हा संदेश या तरूणांनी समाजापुढे उभे केले असुन या कार्याचे पाटोदा तालुक्यासह विविध ठिकाणाहून कौतुक करण्यात येत आहे...

## तहसील कार्यालयातच भरविला निराधारांचा दरबार

### दबंग तहसीलदार किशोर यादव यांनी एकाच छताखाली केला निराधारांच्या सर्व समस्यांचा निपटारा

श्रीक्षेत्र माहूर । दिव्य न्युज
आदेश बेहेरे

माहूर तालुक्यातील इंदिरा गांधी योजना संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना सह निराधार विधवा अपंग महिलां पुरुषांना सेतू केंद्रासह इतर ठिकाणी चकरा माराव्या लागू नये म्हणून तहसील कार्यालयातच बोलावून येथे थंड पाण्याची व्यवस्था करत त्यांच्या सर्व समस्यांचा निपटारा दिनांक ३० रोजी करत कागदपत्रांच्या सर्व अडचणी सोडविण्यासाठी येथे बैठे पथकाची निर्मिती करून सर्व समस्यांचा निपटारा एकाच छताखाली केला गेल्याने सर्व आलेल्या शेकडो निराधारंनी तहसीलदार किशोर यादव यांना यांचे अभिनंदन केले आहे

धडाकेबाज निर्णय घेण्यासाठी प्रसिद्ध असलेले तहसीलदार किशोर यादव यांनी तालुक्यातील निराधार यांना अनेक वेळा आव्हान करूनही त्यांच्या अडचणीमुळे तसेच सेतू सेवा केंद्र आणि इतर कारणामुळे

►► पान २ वर



## जलजीवन मिशनची कामे अंतिम टप्प्यात; ३ गावांना मिळणार फायदा

नेकनूर । दिव्य न्युज शेख शाकेर

नेकनूर ग्रामीण भागातील महिलांची पिण्याच्या पाण्यासाठी वणवण होणारी भटकंती लक्षात घेत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी प्रत्येक घरी नळ जोडण्याची महत्त्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. जलजीवन मिशनअंतर्गत नेकनूरतालुक्यातील गावांमध्ये कामे हाती घेण्यात आली आहे. मंत्री पंकजाताई मुंडे व आमदार नमिताताई मुदंडा यांच्या माध्यमातून नेकनुर चे जिल्हा परिषद सदस्य भारत बप्पा काळे यांनी वेळोवेळी पाणी पुरवठा विभागाकडे पाठपुरावा करून योजना मंजूर करून आणली.

नेकनूर गावासाठी १९ कोटी ५५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पंकजाताई मुंडे व आमदार नमिताताई मुदंडा यांनी गावात

►► पान २ वर





## 2BHK फ्लॅट जिंकण्याची संधी; नाव नोंदणी सुरु

# अरेबियन ज्वेलर्सच्या ड्रॉ मध्ये चार भाग्यवान विजेत्यांना बुलेट बाईक

बीड । दिव्य न्युज

बीड शहरातील प्रसिद्ध अरेबियन ज्वेलर्स यांनी दिनांक २८ जानेवारी रोजी चौथ्या ड्रॅाचे आयोजन केले होते. या भव्य सोहळ्यात चार भाग्यवान विजेत्यांना बुलेट बाईक प्रदान करण्यात आली. हा शानदार कार्यक्रम हॉटेल गोल्डन चॉईस येथे संध्याकाळी ८ वाजता हजारो नागरिकांच्या उपस्थितीत पार पडला.ड्रॅासाठी मान्यवर ॲड. सनाउल्ला इनामदार,इमरान जागीरदार, पाले खान आणि आनंद वीर यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्यांची चिठ्ठी काढण्यात आली. कार्यक्रमादरम्यान नागरिकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. विजेत्यांची नावे १. काशिफ अतिख शेख,मोमिन इम्रान अब्दुल रौफ, शेख खानसा अजीम, अन्सारी जब्बार जफर आसे भाग्यवान विजेत्यांना तत्काळ बुलेट बाईक सुपूर्द करण्यात आल्या, ज्यामुळे उपस्थितांनी अरेबियन ज्वेलर्सवर प्रचंड विश्वास व्यक्त केला.



### ग्राहकांचा विश्वास वाढवणारी बंपर ऑफर!

अरेबियन ज्वेलर्सने यापूर्वी देखील ग्राहकांसाठी भव्य बक्षीस योजना राबवल्या आहेत पहिल्या ड्रॅामध्ये - दोन क्रेटा कार, दुसऱ्या ड्रॅामध्ये-चार बुलेट बाईक,तिसऱ्या ड्रॅामध्ये चार बुलेट बाईक, आता पुन्हा चौथ्या ड्रॅामध्ये चार बुलेट देऊन ग्राहकांचा अरेबियन ज्वेलर्सवरील विश्वास अधिक दृढ होत चालला आहे.

### स्वप्नांचा 2BHK फ्लॅट जिंकण्याची संधी...!

या सोहळ्यात अरेबियन ज्वेलर्सचे मालक महेबूब मल्लिक यांनी पुढील ड्रॅामध्ये भाग्यवान विजेत्याला थेट 2BHK फ्लॅट देण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. नागरिकांनी तत्काळ नावनोंदणीसाठी गर्दी केली.लोकांचा मिळणारा प्रचंड प्रतिसाद पाहता अरेबियन ज्वेलर्स भविष्यात आणखी मोठ्या योजना आणणार असल्याचे संकेत दिले आहेत.

### अफवांवर विश्वास ठेवू नका!

गेल्या काही दिवसांपासून अरेबियन ज्वेलर्सला बदनाम करण्याचे प्रयत्न काही लोकांकडून होत असल्याचे समोर आले आहे. मात्र, ग्राहकांचा मिळणारा जबरदस्त प्रतिसाद आणि वाढता विश्वास पाहता या अफवांना नागरिकांनी गांभीर्याने घेऊ नये, असे आवाहन अरेबियन ज्वेलर्सने केले आहे.


## मिल्लिया महाविद्यालयाचे कामखेडा येथे आरोग्य तपासणी शिबिर



बीड। दिव्य न्युज

येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत सुरु असलेल्या मौजे कामखेडा ता. जि. बीड येथील विशेष शिबिरामध्ये दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे उद्दिष्ट ॲनिमिया विषयी जागरूकता निर्माण करणे, त्याची लक्षणे व प्रतिबंध याबाबत माहिती देणे तसेच सहभागींची तात्काळ तपासणी व सल्ला देणे होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन मौजे कामखेडाचे सरपंच श्री. बिलाल पटेल यांच्या हस्ते संपन्न झाले. श्री. बिलाल पटेल यांनी ॲनिमियाचा आरोग्यावर होणारा परिणाम, विशेषतः महिलांमध्ये आणि किशोरवयीन मुलां-मुलींमध्ये मध्ये, यावर प्रकाश टाकला. तसेच गावातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे सांगितले. हे शिबीर प्राथमिक आरोग्य केंद्र साक्षाळपिंप्री च्या सहकार्याने आयोजित केले होते. श्री. रिझवान बेग (आरोग्य सेवक), श्रीमती कुलाल एल. डी. (आरोग्य सेविका), श्री. सातपुते के. एस. (आरोग्य सेवक), श्रीमती वीर एम. एस. (आरोग्य सेविका) आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची टीम शिबिर यशस्वी करण्यासाठी अथक प्रयत्न करत होती. या शिबिरात १०८ जणांची तपासणी करण्यात आली. प्रत्येक व्यक्तीची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली व ज्यांना कमी स्तर आढळले त्यांना आहारातील बदल आणि जीवनशैली सुधारण्याबाबत वैयक्तिक सल्ला देण्यात आला. तसेच गरजूंना मोफत लोह व

►► पान २ वर

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०